**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १००५/२०१३.</u>**
**<u>नि.क्र. ९४.</u>**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.०२ भाउसाहेब नामदेव मुन्तोडे यांचा पुढील सरतपास विधीज्ञ श्री. व्ही. के. कांगणे यांचेमार्फत शपथेवर सुरु :-</u>**

**०१.** सदरच्या प्रकरणांत मी पुरावाकामी प्रतिज्ञालेख दाखल केला असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो. **<u>नि.क्र. ९४</u>** वर आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे विधीज्ञ श्री. मालपाणी यांच्यामार्फत सुरुः-</u>**

**०२.** मला प्रतिवादींची नावे माहित नाही. वाद मिळकतीचा गट क्रमांक २८६ आहे. मला लिहीता वाचता येते. मी वाद मिळकतीचा ७/१२ उतारा पाहिलेला नाही. त्यामुळे, ७/१२ उता-यावर पिक पाहणी सदरी कोणाचे नाव आहे तसेच, वाद मिळकत कोणाच्या नावावर आहे, हे मला सांगता येणार नाही. हुसेन कासम शेख व सय्यद कासम शेख यांना मी ओळखतो, ते माझ्या शेजारीच राहतात व माझ्या शेजारीच जमिन वहिती करतात. हुसेन कासम शेख व सय्यद कासम शेख हे माझ्या उगवता बाजुने म्हणजेच पुर्वेकडुन जमिन वहिती करतात. हुसेन कासम शेख व सय्यद कासम शेख यांच्या जमिनीचा गट क्रमांक २७५ आहे. माझ्या जमिनीचा गट क्रमांक २७४ आहे. हे म्हणणे खरे आहे की, हुसेन कासम शेख व सय्यद कासम शेख यांचा वाद मिळकतीच्या मालकाशी काय व्यवहार आहे, हे मला माहित नाही. हे मला माहित नाही की, वाद मिळकत ही हुसेन कासम शेख व सय्यद कासम शेख यांच्याकडे खंडाणे आहे. हे मला माहित नाही की, वाद मिळकतीच्या ७/१२ उता-यावर पिक पाहणी सदरी हुसेन कासम शेख व सय्यद कासम शेख यांची नावे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, जो व्यक्ती जमिन वहिती करतो त्याचे नाव पिक पाहणी सदरी लावले जाते. आज मला न्यायालयात वादी उल्हास घ ेवुन आला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या सांगण्यावरुन मी आज साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्याकामी प्रतिज्ञालेखातील मजकुर खोटा असुन मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण</u>.**
**<u>फेरतपास काहीही नाही</u>.**

**<u>प्रतिवादी क्र. ४ व ५ गैरहजर. त्यामुळे, उलटतपास काही नाही</u>.**

**<u>सा.वा.दा.ब.अ.क.के.</u>**

JOSHI PRASAD BALKRISHNA
Digitally signed by JOSHI PRASAD BALKRISHNA
Date: 2026.03.05 18:01:19 +0530

**दिवाणी न्यायाधीश व.स्तर, संगमनेर.**
**दि. ०५/०३/२०२६.**

**श्रवणोत्तर स्विकृती**

JOSHI PRASAD BALKRISHNA
Digitally signed by JOSHI PRASAD BALKRISHNA
Date: 2026.03.05 18:01:15 +0530

**( प्रसाद बा. जोशी )**
**५ वे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, संगमनेर.**